जा.क्र.तंशिविकापु/विवि/संकिर्ण/२०१८/५२३३

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे – ४११०१६.
दिनांक :-१०/१२/२०१८

**कालमर्यादित**

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी/पदविका संस्था/कार्यालये
यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

यांना कळविण्यात येते की, सोबत तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/आढावाबैठक/२०१८/२२६, दि. १०/१२/२०१८ चे अवलोकन करण्यात यावे. त्या अनुषंगाने सोबतच्या परिपत्रकामधील बैठकीच्या विषयसूचीचे अवलोकन करण्यात येवून त्याबाबतची माहिती घेवून संस्थेच्या संचालक/प्राचार्य यांनी स्वतः उपस्थित रहावे. **दिनांक १३ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता** सिडनेहॅम इन्स्टिटयूट,चर्चगेट, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली असून बैठकीच्या विषयसूचीत नमूद मुद्दयाबाबत आपल्या संस्थेशी निगडीत माहिती/वस्तुस्थिती/अभिप्रायात्मक टिपणी सदर बैठकीच्यावेळी सादर करावी. तसेच सदर आढाव्याच्या माहितीची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सोबत : तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे दि.१०/१२/२०१८ रोजीच्या पत्राची प्रत

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी

# तंत्र शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी — ३०२३३४७६, २६९२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६१००७

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


बैठकीची सूचना
बैठक दिनांक : १३.१२.२०१८

क्रमांक : १६/आस्था/आढावा बैठक/२०१८/२२६
दिनांक : १०.१२.२०१८

प्रति,
१.प्राचार्य, सर्व शासकीय पदवी अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र संस्था,
२.प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने,
३. प्राचार्य, हॉटेल मॅनेजमेंन्ट अ‍ॅन्ड कॅटरिंग टेक्नोलोजी. पुणे / नागपूर.
४. प्राचार्य, शासकीय मुद्रण तंत्र संस्था, मुंबई

**विषय : तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या शासकीय संस्थांच्या प्राचार्यांची बैठक.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या सर्व शासकीय संस्थाच्या प्राचार्यांची बैठक **दि.१३.१२.२०१८ रोजी सकाळी ११.३०** वाजता सिडनेहॅम इन्स्टिटयूट, चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग व मा. उपसचिव, तंत्र शिक्षण हे सुध्दा उपस्थित राहणार आहेत.

सदर बैठकीच्यावेळी आपण आपल्या संस्थेबाबतच्या खालील मुदयांस अनुसरून सादरीकरण तयार करावयाचे असून सदर सादरीकरण (Presentation) बैठकीच्यावेळी सोबत आणावे.

१. आपल्या संस्थेच्या Development बाबतचे आपले Vision व त्याअनुषंगीक Action Plan.
२. आपल्या संस्थेच्या N B A Accrediation व गुणवत्ता वाढीसाठी करण्यात येत असलेले प्रयत्न व याबाबतची सद्यस्थिती.
३. उद्योगधंदयाशी समन्वय साधण्यासाठी (Industry Institutions Interaction) तसेच विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता (Employbility) वाढविण्यासाठी संस्था स्तरावर करण्यात येत असलेले प्रयत्न.
४. आपण मागील एक वर्षामध्ये संस्थेमध्ये केलेली वैशिष्टयपूर्ण कामे.

बैठकीबाबतची विषयसूची खालील प्रमाणे देण्यात येत असून सदर विषयसूचीत नमूद मुद्दांबाबत आपल्या संस्थेशी निगडीत माहिती/वस्तुस्थिती/अभिप्रायात्मक टिप्पणी बैठकीच्या वेळी सादर करावी.

**बैठकीची विषयसूची :**

१. संस्थेशी संबंधित प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे /अवमान याचिका याबाबतची वर्षनिहाय व न्यायालयनिहाय सद्यस्थिती.
२. शै.वर्ष २०१८-१९ मध्ये संस्थेची अभ्यासक्रमनिहाय प्रथम वर्ष प्रवेशाबाबतची मंजूर,भरलेल्या व रिक्त जागांची सांख्यिकी माहिती तसेच संस्थेमध्ये इतर वर्षात प्रवेशित विद्यार्थाची अभ्यासक्रमनिहाय सांख्यिकी माहीती.
३. संस्थेतील वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गातील मंजूर, भरलेल्या व रिक्त जागांची पदनिहाय माहिती
४. शैक्षणिक वर्ष -२०१८-१९ मधील प्रवेशाचे अनुषगाने कमी प्रवेशित विद्यार्थी संख्या असलेल्या अभ्यास क्रमांत कार्यरत शिक्षकवर्गाच्या, संबंधित संस्थेमध्ये आवश्यकते बाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्याचे अभिप्राय व प्रस्ताव
५. संस्थाना सन २०१८-१९ मध्ये देण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या बांधकामाची सद्यस्थिती, पुढील वर्षात आवश्यक निधी व यंत्रसामुग्री खरेदीबाबतची सद्यस्थिती

६. संस्थेच्या अभ्यासक्रमांच्या N B A बाबतची संस्था स्तरावरुन करण्यात आलेली कार्यवाही व त्या बाबतचे संस्थास्तरावरील नियोजन.

७. संस्थेमध्ये राबविण्यात येत असलेल्या खालील उपक्रम/ विषयांबाबत संस्था स्तरावरुन करण्यात येत असलेली कार्यवाही व त्याबाबतची सद्यस्थिती.

- वृक्ष लागवड उपक्रम
- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमीत्त आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने संस्थास्तरावरील कार्यवाही व रुपरेषा.
- Degitisation of Library, E-governance, Industrial Projects इत्यादीबाबतची माहिती.
- संस्था स्तरावर Industry सोबत केलेल्या MOU बाबतची माहिती खालील प्रपत्रात स्वतंत्रपणे (Soft Copy) सहित सादर करावी.

| अ.क्र | संस्थचे नांव | सामजस्य करार केलेल्या Industry नांव | MOU चा दिनांक | MOU बाबतचा विषय व संक्षिप्त माहिती | MOU चे अनुषंगाने झालेली कार्यवाही | MOU चे outcome / Beneficiary |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

- CEP अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती.
- संस्थामध्ये संशोधन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न व प्रोत्साहनपर योजनांची माहिती.
- विद्यार्थ्यांच्या Training व Placement बाबत संस्थेकडून करण्यात येत असलेले प्रयत्न.
- संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाबाबत संस्था स्तरावरुन करण्यात येत असलेली कार्यवाही.
- संस्थेमध्ये विद्यार्थ्यांसाठी व समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांबाबत संक्षिप्त माहिती.
- संस्थेमध्ये Internal Revenue generation बाबत करण्यात येत असलेले प्रयत्न.

८. संस्थेमध्ये सुरु असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनेबाबतची योजनानिहाय माहिती.

९. संस्थेतील P.L.A व इतर लेख्यामध्ये उपलब्ध निधीची माहिती.

१०. संस्थेतील परीसरातील स्वच्छता, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमधील शिस्त, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, संस्थेच्या परीसराचे सुशोभिकरण याबाबत संस्थेकडून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती

उपरोक्त बैठकीसाठी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / प्राचार्य पदाचा कार्यभार असलेल्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित रहावे. बैठकीसाठी प्रतिनिधी पाठवू नये.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना कळविण्यात येते की, त्यानी सदर बैठकीसाठी उपस्थित रहावे तसेच संबंधित विभागातील संस्थेची माहिती बैठकीच्या वेळी सादर करण्यासाठी संस्थाना सूचित करण्यांत यावेत.
४. सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर विषय सूचीमध्ये आपल्या कार्यासनाशी संबंधित मुद्दाबाबत आपली सविस्तर वस्तुस्थिती दर्शक टिप्पणी दिनांक १२.१२.२०१८ पुर्वी मा.संचालकांच्या अवलोकनार्थ श्रीम.पेडणेकर, कार्यासन क्रमांक-१ यांच्याकडे सादर करावी.